मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड शहरात 7 जुलैपर्यंत जमावबंदीचे आदेश

## पाचपेक्षा अधिक व्यक्तींच्या जमावास बंदी; शस्त्रे, घोषणाबाजी, मिरवणुका आणि परवानगीशिवाय सभा घेण्यास मनाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी पोलीस सह आयुक्त, सारंग आवाड यांनी प्राप्त अधिकाराचा वापर करुन व महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात 24 जून 2026 रोजी 00.01 पासून ते 7 जुलै 2026 रोजी 24 वाजेपर्यंत खाली नमूद केलेली कृत्य करण्यास या आदेशान्वये मनाई करीत आहे.



### आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई

» **पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाने लागू केलेल्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येणार आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. आदेशाच्या कालावधीत पाचपेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव, परवानगीशिवाय सभा-मोर्चे, शस्त्रे किंवा स्फोटक साहित्य बाळगणे, आक्षेपार्ह घोषणाबाजी आणि सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या कृतींना मनाई करण्यात आली आहे. कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागरिकांनी पोलिसांना सहकार्य करावे आणि कोणत्याही अफवा किंवा बेकायदेशीर कृतींपासून दूर राहावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.**

कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ द्रव्य बरोबर नेणे. दगड अथवा शस्त्रे किंवा अस्त्रे सोडावयाची अस्त्रे किंवा फेकावयाची हत्यारे अगर साधने बरोबर नेणे. शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, दंड, काठ्या, बंदुका व शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे. कोणत्याही इसमाचे चित्राचे प्रतिकात्मक प्रेताचे किंवा पुढा-यांचे चित्राचे प्रतिमेचे प्रदर्शन व दहन करणे. मोठ्याने अर्वाच्य घोषणा देणे, वाद्य वाजविणे. ज्यामुळे सभ्यता अगर नितिमत्ता यास धोका पोहचेल किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा राज्य उलथवून देण्यास प्रवृत्त करेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे किंवा अविर्भाव करणे कोणतेही जिन्नस तयार करुन त्याचा जनतेत प्रसार करणे. ज्या योगे वरील परिसरात कायदा व सुव्यवस्था धोक्यात येईल अशा पध्दतीने कलम 37(1) व (3) विरुध्द वर्तन करणे. कलम 37 चे पोटकलम (3) अन्वये पाच पेक्षा जास्त लोकांचा जमाव करणे, तसेच पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे पुर्व परवानगी शिवाय सभा घेणे किंवा मिरवणुका काढणेस बंदी घालण्यात येत आहे.

वरील संपूर्ण आदेश हा शासनाच्या सेवेतील व्यक्तींना व ज्यांना आपल्या वरीष्ठांच्या आदेशानुसार कर्तव्यपुर्तीसाठी हत्यार वाळगणे आवश्यक आहे व त्याबबात परवानगी आहे त्यांना लागू होणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित व्यक्ती महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 135 प्रमाणे शिक्षेस पात्र होईल.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पाणीप्रकल्पांसाठी ठेवी मोडण्याचा निर्णय; पवना योजना पुन्हा सुरु होणार

## बंद जलवाहिनी व आंद्रा धरणातून 100 एमएलडी पाणी आणण्यास प्राधान्य; 15 वर्षांपासून रखडलेला प्रकल्प मार्गी लागण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन, गेल्या १५ वर्षांपासून ठप्प असलेल्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प करण्याचा निर्धार सत्ताधारी भाजपासह प्रशासनाने केला आहे. तसेच, थेट आंद्रा धरणातून स्वच्छ १०० एमएलडी पाणी आणण्याच्या कामास प्राधान्य देण्यात आले आहे. त्या कामांसाठी महापालिकेच्या तब्बल ५५० कोटी रुपयांच्या ठेवी मोडण्यात येणार आहेत. त्या रकमेतून शहरासाठी अत्यावश्यक असलेल्या पाणी प्रकल्पांवर भर दिला जाणार आहे, असा दावा सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आला आहे. त्यादृष्टीने पदाधिकाऱ्यांसह प्रशासनाकडून हालचालींना वेग आला आहे.




शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या पुढे गेली आहे. त्यासाठी शहरसाठी महत्त्वपूर्ण असलेला पवना भूमिगत जलवाहिनी प्रकल्प पूर्ण करण्याची गरज निर्माण झाली आहे. त्या प्रकल्पाचा १ हजार २०० कोटी रुपयांचा सुधारित डीपीआर तयार करण्यात आला आहे. तसेच, राज्य सरकाने त्या कामावरील स्थगितीही ८ सप्टेंबर २०२२ ला उठवली आहे. तो प्रकल्प पूर्ण केल्यास शहराला अतिरिक्त १०० एमएलडी पाणी उपलब्ध होणार आहे. तसेच, पाणी प्रदूषणाला आळा बसणार असून, शहराला स्वच्छ पाणी मिळणार आहे. त्या कामासाठी केंद्राच्या अर्बन चॅलेंज फंडातून तसेच, बँका आणि वित्तीय संस्थांकडून निधी मिळण्यासाठी तत्कालिन आयुक्त शेखर सिंह यांच्या कार्यकाळापासून प्रयत्न सुरू आहेत. मात्र, त्याला अद्याप यश आलेले नाही.

निधीअभावी पाण्याचे प्रकल्प अजून अडकून पडू नये, म्हणून सत्ताधारी भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या सर्वसाधारण निधीच्या ठेवीतील ५५० कोटी रुपये मोडण्याचा निर्णय घेतला आहे. ती रक्कम पवना बंद जलवाहिनी, तसेच, थेट आंद्रा धरणातून १०० एमएलडी पाणी आणण्यासाठी जॅकवेल व भूमिगत जलवाहिनी टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. ते दोन प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराला मुबलक पाणी मिळेल, असा दावा सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

# राज्यातील मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा द्या

## आमदार महेश लांडगे यांची विधानसभेत मागणी, औचित्याचा मुद्दा सत्रात त्यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले

**पिंपरी | प्रतिनिधी**

कोरोना काळातील आर्थिक फटका, वाढते खर्च, परवानग्यांची गुंतागुंत आणि रोजगाराच्या अस्थिरतेचा सामना करणाऱ्या मंडप व्यवसायाला दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने पावले उचलावीत. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असल्याने मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा, उद्योगाचा दर्जा आणि विविध कल्याणकारी सुविधांचा लाभ द्यावा, अशी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली. महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहाच्या अध्यक्षस्थानी विधानसभेचे उपाध्यक्ष आण्णा बनसोडे होते. यावेळी औचित्याचा मुद्दा सत्रात आमदार लांडगे यांनी राज्य शासनाचे लक्ष वेधले.




आमदार लांडगे म्हणाले की, मंडप व्यवसाय हा केवळ विवाह सोहळे, धार्मिक कार्यक्रम किंवा सामाजिक समारंभांपुरता मर्यादित नसून आपत्ती व्यवस्थापन, शासकीय कार्यक्रम, निवडणुका, आरोग्य शिबिरे, सांस्कृतिक उपक्रम तसेच विविध सार्वजनिक सेवांच्या आयोजनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतो. राज्यातील लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह या व्यवसायावर अवलंबून असूनही या क्षेत्राला अद्याप अपेक्षित मान्यता आणि सुविधा मिळालेल्या नाहीत.

विधानसभेत मांडलेल्या मागण्यांमध्ये मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा दर्जा देण्याबरोबरच उद्योगाचा दर्जा प्रदान करणे, परवानगी प्रक्रियेत सुलभता आणणे, एकात्मिक परवानगी व्यवस्था लागू करणे, कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविणे, विमा संरक्षण उपलब्ध करणे, कौशल्य विकास प्रशिक्षण देणे आणि विविध शासकीय योजनांचा लाभ या क्षेत्रापर्यंत पोहोचविण्याची मागणी करण्यात आली.

कोरोना काळात मंडप व्यवसायाला मोठा आर्थिक फटका बसल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. अनेक व्यावसायिक आणि कामगारांना रोजगार गमवावा लागला होता. आजही वाढते खर्च, विविध परवानग्या, नियमांची गुंतागुंत आणि आर्थिक अडचणींमुळे हा व्यवसाय अनेक संकटांचा सामना करत असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील मंडप व्यवसायाशी संबंधित संघटना, कामगार आणि व्यावसायिकांच्या मागण्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे आमदार लांडगे यांनी स्पष्ट केले. मंडप व्यवसाय वाचला तर लाखो हातांना रोजगार मिळेल आणि हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह सुरक्षित राहील. त्यामुळे शासनाने या क्षेत्राला बळकटी देण्यासाठी तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी विधानसभेत केली.

> **मंडप व्यवसाय हा लाखो कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार आहे. या क्षेत्रातील कामगार, कारागीर आणि व्यावसायिकांना न्याय मिळवून देण्यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करणार आहे. मंडप व्यवसायाला अत्यावश्यक सेवेचा व उद्योगाचा दर्जा मिळावा, तसेच शासनाच्या सर्व सुविधा या क्षेत्रापर्यंत पोहोचाव्यात यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही मागणी करणार आहे. मंडप व्यवसाय वाचला तर लाखो हातांना काम मिळेल आणि हजारो कुटुंबांचा संसार सुरक्षित राहील. या क्षेत्राला सन्मान, संरक्षण आणि विकासाच्या संधी मिळवून देण्यासाठी शासनाकडे ठोस भूमिका घेण्याची मागणी आम्ही सातत्याने करत राहू.**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# थेरगाव केजुदेवी बंधाऱ्यात पाणी फेसाळले; पवना नदी प्रदूषणावर नागरिकांचा संताप

## रासायनिक सांडपाणी सोडल्याचा संशय; पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताबाबत गंभीर चिंता

**पिंपरी | प्रतिनिधी**

थेरगाव येथील केजुदेवी बंधाऱ्यातील पाणी मोठ्या प्रमाणात फेसाळल्याचे निदर्शनास आले. नदीपात्रात पांढऱ्या फेसाचे थर तरंगत असल्याने रासायनिक प्रक्रिया केलेले सांडपाणी नदीत सोडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.



रात्रीपासूनच पाण्यात फेस तयार होण्यास सुरुवात झाली होती. सकाळी केजुदेवी बंधाऱ्यावर फेसाचे मोठे लोट दिसून आले. बंधाऱ्यात यापूर्वीही विषारी पाण्यामुळे मासे मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडल्या आहेत. रासायनिक प्रक्रिया केलेले सांडपाणी नदीत सोडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच पर्यावरण कार्यकर्त्यांच्या मते, प्रक्रिया न केलेले घरगुती सांडपाणी पवना नदीत सोडणे हे प्रदूषणाचे मुख्य कारण आहे.

पवना नदी हे पिंपरी-चिंचवडकरांसाठी पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्त्रोत आहे. त्यामुळे नागरिक व पर्यावरण कार्यकर्त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. सकाळी फिरण्यासाठीलेल्या नागरिकांनी नदीतील प्रदूषण पाहून चिंता व्यक्त केली. वारंवार अशा घटना घडत असतानाही ठोस उपाययोजना का केल्या जात नाहीत, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला.

कंपन्यांचे रासायनिक सांडपाणी तसेच प्रक्रिया न केलेले औद्योगिक पाणी थेट नदीत सोडले जात असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. शहरातील अनेक नालेही थेट नदीला मिळत असल्याने पवना नदीचे प्रदूषण वाढत आहे. पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणारी ही महत्त्वाची नदी दूषित होत असल्याने भविष्यात गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

महापालिकेचा पर्यावरण विभाग आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

नदी प्रदूषणामुळे जलचर, वनस्पती आणि पर्यावरण धोक्यात आले असून दूषित पाण्यामुळे साथीचे आजार वाढण्याची शक्यता तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. शासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रदूषणाचे मूळ शोधावे आणि कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. याबाबत पर्यावरण विभागाचे मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांच्याशी संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.

> **केजूदेवी बंधाऱ्याच्या वरील भागात रावेत बंधारा आहे. तिथून पिण्याचे पाणी उचलले जाते. दोन्ही बंधाऱ्याच्या मधल्या भागात पावसामुळे पाण्याची पातळी वाढते. त्यामुळे नदीपात्रावरील सर्व गाळ ढवळल्यामुळे पाण्याला फेस येतो आणि बंधाऱ्यातील पाणी फेसाळते.**
>
> **- मंचक जाधव उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पिंपरी-चिंचवड**

# पुणेकरांना कमी दाबाच्या पाणीपुरवठ्याचा फटका

## 141 पैकी केवळ 50 झोनचे काम पूर्ण; दिवसाआड पाणीपुरवठ्यामुळे जलवाहिन्यांमध्ये हवेची पोकळी, अनेक भागांत पाणीपुरवठा विस्कळीत

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांनी तळ गाठल्याने महापालिकडून १५ जूनपासून दिवसाआड पाणी दिले जात आहे. मात्र, हे नियोजन करताना महापालिकेच्या जलवाहिन्यांमध्ये हवेची पोकळी निर्माण होत असल्याने दुसऱ्या दिवशी शहराच्या अनेक भागात कमी दाबाने पाणी जात आहे. त्यामुळे महापालिकेचे पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडले आहे. या समस्येवर तोडगा काढायचा असल्यास शहरातील पाणीपुरवठ्याचे स्वतंत्र झोन असणे आवश्यक आहे.

मात्र, भविष्यातील पाणी नियोजनासाठी अशा प्रकारचे झोनचा समावेश असलेल्या समान पाणी योजनेचे काम रखडल्याने त्याचा फटका पुणेकरांना सहन करावा लागत आहे. समान पाणी योजनेत पाणीपुरवठा विभागाने १४१ झोनपैकी केवळ ५० झोनचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, त्या भागातही टाक्यांची, तसेच पाणी मीटर बसविण्याची कामे अर्धवटच असल्याने प्रशासनास पुरेशा दाबाने पाणी देणे शक्य होत नसल्याने कोट्यवधी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेल्या या प्रकल्पाच्या परिणामकारकतेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.



या योजनेनुसार प्रत्येक नागरिकाला प्रतिदिन १३५ लिटर पाणी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट आहे. प्रशासनाच्या माहितीनुसार काही भागांतील प्रतिमाणसी पाणीपुरवठा ३५ ते ४० लिटरवरून १०० ते १५० लिटरपर्यंत वाढला आहे. मात्र, काही ठराविक भागातच ही स्थिती असून, ज्या ठिकाणी झोनचे नियोजन नाही त्या ठिकाणी प्रशासनास पाणीपुरवठ्यात अडचणी येत आहेत.

समान पाणीपुरवठा योजनेचे काम २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, कोविड काळातील विलंब, विविध विभागांच्या परवानग्या, रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाशी संबंधित अडचणी, तसेच ठेकेदारांकडून झालेल्या विलंबामुळे प्रकल्प रखडला. उर्वरित काम पुढील पाच ते सहा महिन्यांत पूर्ण करण्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

महापालिकेने जुन्या पाणीपुरवठा व्यवस्थेची पुनर्रचना करत समान पाणी योजनेत शहराची १४१ झोनमध्ये विभागणी केली आहे. मात्र, आता पर्यंत केवळ ५० झोनचे काम पूर्ण झाले आहे. प्रत्येक झोनसाठी स्वतंत्र पाण्याची टाकी, जलवाहिन्या आणि मीटर प्रणाली उभारण्यात येत आहे.

### १४१ झोनपैकी केवळ ५० झोन पूर्ण

**» पुणे शहरातील समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत संपूर्ण शहराची १४१ स्वतंत्र झोनमध्ये विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक झोनसाठी स्वतंत्र जलवाहिन्या, पाण्याच्या टाक्या आणि मीटर यंत्रणा उभारण्याचे नियोजन करण्यात आले. मात्र, आतापर्यंत केवळ ५० झोनचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित भागांमध्ये कामे रखडल्याने शहरभर समान आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट अद्याप साध्य झालेले नाही. त्यामुळे दिवसाआड पाणीपुरवठ्याच्या काळात अनेक भागांत कमी दाबाने किंवा अत्यल्प वेळ पाणी मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.**

### रखडलेल्या प्रकल्पामुळे पुणेकरांचा संयम संपत चालला

**» समान पाणीपुरवठा योजना २०२३ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र कोविड काळातील अडथळे, विविध विभागांच्या परवानग्या, रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाशी संबंधित तांत्रिक अडचणी तसेच ठेकेदारांकडून झालेला विलंब यामुळे प्रकल्प रखडला. बाणेर, बालेवाडी, पाषाण, सूस, वारजे, कोंढवा आणि सिंहगड रस्ता परिसरातील काही झोन पूर्ण झाल्याचा दावा प्रशासन करत असले तरी नागरिकांच्या तक्रारी कायम आहेत. त्यामुळे कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही प्रकल्पाची परिणामकारकता आणि कामाच्या गुणवत्तेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.**

### दिवसाआड पाणीपुरवठ्यामुळे वाढल्या अडचणी

**» धरणांतील जलसाठा कमी झाल्याने १५ जूनपासून पुण्यात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र, या पद्धतीमुळे जलवाहिन्यांमध्ये हवेची पोकळी निर्माण होत असल्याने पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर अपेक्षित दाब मिळत नाही. परिणामी अनेक भागांत नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नाही. काही ठिकाणी नळांना पाणी उशिरा येते, तर काही भागांत टाक्या पूर्ण भरत नाहीत. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाच्या नियोजनातील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या असून नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.**

---

# ‘हरित पुणे’ मोहिमेला गती; वृक्षलागवडीसाठी विभागनिहाय आढावा सुरू

## पर्यावरण संवर्धनासाठी महापालिकेची पुढाकार; अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून वृक्षलागवडीचे अहवाल मागविण्याची प्रक्रिया सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

वाढते तापमान, घटते हरित क्षेत्र आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महापालिकेने हरित पुणे, समृद्ध पुणे ही विशेष मोहीम हाती घेतली. या मोहिमेत पालिकेच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना किमान एक वृक्ष लावणे तसेच दोन वर्षे संगोपन करणे बंधनकारक केले होते. पर्यावरण दिनी ५ जून रोजी अभियानास प्रारंभही झाला. त्यानंतर प्रत्यक्षात एकाही अधिकारी, कर्मचाऱ्याने वृक्ष लागवड केल्याची नोंद नाही. विकासकामांसाठी तत्पर वृक्षतोड करणारी पालिका वृक्षलागवडीबाबत एवढी उदासीन का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.



शहराचे हरित आच्छादन वाढविण्यासाठी वृक्ष प्राधिकरणामार्फत पावसाळ्यात स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्याचे नियोजन केले होते. त्यात प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याने किमान एक वृक्ष लावणे अपेक्षित होते. वृक्षारोपणच नव्हे तर त्याचे पुढील दोन वर्षे संगोपन करून तो जिवंत राहील याची जबाबदारी संबंधितांवर होती.

पालिकेने पुणेकरांनाही पावसाळ्यात वृक्ष लागवडीचे आवाहन केले होते. त्याचा एक भाग म्हणून उद्यान विभागामार्फत पाच रुपयांत पाच-सहा वर्षे वाढ झालेली देशी झाडे देण्याची सोय केली होती. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत २० हजार रोपांची विक्री झाली आहे. एकीकडे पुणेकर पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेत असताना दुसरीकडे पालिका स्वतःच्या मोहिमेकडे पाठ फिरवत आहे.

आयुक्तांच्या आदेशानुसार सर्व विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचाऱ्यांना वृक्षलागवडीच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार आता सर्वांकडून अहवाल मागविण्यात आले आहेत. मात्र, अद्याप कोणाचाही अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सर्व विभागांकडून पुन्हा एकदा माहिती मागविण्यात येणार असल्याची माहिती उद्यान विभागाचे प्रमुख अशोक घोरपडे यांनी दिली.

### पुणेकरांचा उत्स्फूर्त सहभाग

**» महापालिकेच्या वृक्षलागवड आवाहनाला नागरिकांकडून मात्र चांगला प्रतिसाद मिळत आहे. उद्यान विभागाने अवघ्या पाच रुपयांत पाच ते सहा वर्षे वाढ झालेली देशी वृक्षरोपे उपलब्ध करून दिली आहेत. या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळून आतापर्यंत सुमारे २० हजार रोपांची विक्री झाली आहे. वाढते तापमान आणि कमी होत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेऊन अनेक नागरिकांनी स्वतःहून वृक्षलागवडीचा संकल्प केला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी पुणेकर पुढाकार घेत असताना महापालिकेच्या स्वतःच्या यंत्रणेतील सहभाग अत्यल्प असल्याचे चित्र समोर आले आहे.**

# बारामतीच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला गती

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ॲक्शन मोडमध्ये; बारामती शहर आणि तालुक्यातील 23 पाणी योजनांचा घेतला आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती शहर व परिसरातील पाणीपुरवठा व्यवस्था अधिक सक्षम, परिणामकारक आणि दीर्घकालीन स्वरूपाची करण्याच्या दृष्टीने जळोची व तांदुळवाडी पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कडून बारामती नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या.

बारामती शहर पाणीपुरवठा योजनेसह तालुक्यातील २३ पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेण्यासाठी विधान भवन येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या राज्यमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे, बारामती नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सचिन सातव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे प्रधान सचिव पराग जैन-नैनुटिया, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील (दूरदृश्य प्रणालीद्वारे), बारामती नगरपरिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांच्या मुख्य अभियंता वैशाली आवटे, बारामती नगरपालिकेचे गटनेते संजय संघवी तसेच नगरसेवक अल्ताफ सय्यद उपस्थित होते.

बैठकीत बारामती शहरातील जळोची-तांदुळवाडी पाणीपुरवठा योजना व शहर पाणीपुरवठा योजना टप्पा-१ अंतर्गत पूर्ण झालेली कामे तातडीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून बारामती नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिले. तसेच बारामती शहर पाणीपुरवठा योजना टप्पा-२ मधील प्रलंबित कामे डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी आवश्यक कार्यवाही गतीने करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

बारामती शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी उभारण्यात आलेल्या साठवण तलावामध्ये आढळून आलेली गळती तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. पाणीपुरवठा व्यवस्थेवर कोणताही परिणाम होणार नाही, याची दक्षता घेत आवश्यक तांत्रिक उपाययोजना तत्काळ राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या.



### टप्पा-२ प्रकल्प डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य

» अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाने 'ब' वर्गातील ४५ हजार सभासदांना 'अ' वर्गात समाविष्ट करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सन २०१५ पासून सदस्य असलेल्या आणि किमान तीन वर्षे सक्रियपणे कार्यरत असलेल्या सभासदांना ही संधी मिळणार आहे. यामुळे यापूर्वी मतदानापासून वंचित असलेल्या हजारो कलाकार, तंत्रज्ञ आणि कामगारांना महामंडळाच्या निवडणुकांमध्ये मतदानाचा अधिकार मिळेल. मराठी चित्रपटसृष्टीतील लोकशाही प्रक्रियेला बळकटी देणारा हा निर्णय मानला जात असून, सभासदांच्या वाढ होणार आहे.

### जळोची-तांदुळवाडी योजना हस्तांतरणाला गती

» बारामती शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम आणि परिणामकारक करण्यासाठी जळोची व तांदुळवाडी पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बारामती नगरपरिषदेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. या हस्तांतरणामुळे देखभाल, दुरुस्ती आणि तांत्रिक निर्णय स्थानिक पातळीवर अधिक वेगाने घेता येतील. शहर पाणीपुरवठा योजना टप्पा-१ अंतर्गत पूर्ण झालेली कामे तातडीने नगरपरिषदेकडे सोपविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे नागरिकांना अधिक कार्यक्षम, नियमित आणि दर्जेदार पाणीपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

### २३ पाणीपुरवठा योजनांचा सर्वंकष आढावा

» बैठकीत बारामती तालुक्यातील एकूण २३ पाणीपुरवठा योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रशासकीय मान्यता मिळालेल्या योजनांची कामे वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्यात आला आहे. तसेच साठवण तलावातील गळती दुरुस्त करणे, तांत्रिक अडचणी दूर करणे आणि पाणीपुरवठा व्यवस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांच्या सूचनाही देण्यात आल्या. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी वेळबद्ध पद्धतीने काम करावे, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

# पावसाने वाहतुकीचा खोळंबा; प्रमुख रस्त्यांवर तासन्तास कोंडी


## पावसामुळे शहरातील विविध भागांत वाहतुकीचा वेग मंदावला; नियंत्रण कक्षाला 15 तक्रारींचे कॉल

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात सुरू झालेल्या पावसामुळे प्रमुख रस्त्यांवर प्रचंड वाहतूक कोंडी झाली. त्याचबरोबर शहरातील प्रमुख रस्त्यांवर चार ते पाच ठिकाणी गाड्या बंद पडल्यामुळे वाहतूक कोंडी झाली. याबाबत नियंत्रण कक्षाला बुधवारी (दि. २४) दिवसभरात तक्रारीचे पंधरा कॉल प्राप्त झाले होते. दरम्यान, वाहतूक पोलिसांनी तात्काळ उपायोजना करत क्रेनच्या साह्याने चारचाकी गाड्या रस्त्यातून बाजूला केल्या.

शहरातील काही प्रमुख रस्त्यांवरील सकाळी ९ ते ११ च्या सुमारास वाहतुकीचा वेग मंदावला होता. पावसाळी वातावरण, सुरू असलेली रस्त्यांची कामे आणि वाढती वाहनसंख्या यामुळे अनेक भागांत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

यामध्ये खडी मशिन चौक, सोलापूर रोड, केसनंद गाव, टिळक चौक, खंडोजीबाबा चौक, केशवनगर मुंढवा चौक, कोरेगाव पार्क नॉर्थ मेन रोड, धानोरी जकात नाका, सिंहगड रोड श्री कंट्रोल चौक, पंधरा नंबर हडपसर, घोलेवस्ती काळेपडळ येथील परिसरात वाहतूक कोंडी झाल्याचे नियंत्रण कक्षाला कॉल प्राप्त झाले होते. नियंत्रण कक्षाकडून तत्काळ संबंधित वाहतूक विभागाला ही माहिती देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी वाहतूक कोंडी सुरळीत केली. दरम्यान, सकाळपासूनच पाऊस सुरू असल्यामुळे अनेकांनी चारचाकी गाड्या बाहेर काढल्या होत्या. अशातच पाच ते सहा ठिकाणी गाड्या बंद पडल्या. त्यामुळे मोठी कोंडी झाली.



### खडीमशिन चौकात तीन तास कोंडी

» कोंढवा बुद्रुक परिसरातील खडीमशिन मुख्य चौक व चौकाच्या आसपास पावसामुळे कंटेनर, बस, टेम्पो बंद पडल्यामुळे तब्बल तीन तास वाहतूक कोंडी झाली होती. यामुळे कात्रज, उंड्री, कोंढवा खुर्द व येवलेवाडी बाजूला जाणाऱ्या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. बुधवारी (दि. २४) सकाळी ८ लाच रिमझिम पाउस सुरू झाला. दरम्यान कोंढवा खुर्दकडून येणारी पीएमपी खडीमशिन मुख्य चौकात बंद पडली. खडीमशीन चौकातून बोपदेव घाटाकडे जाणारा कंटेनर चौकापासून 50 फुटांवर बंद पडला. तर उंड्रीकडून कात्रजकडे जाणारा टेम्पो चौकापासून काही अंतरावर बंद पडला. एकाचवेळी तीन वाहने बंद पडल्यामुळे काही क्षणात खडीमशिन चौक वाहतूक कोंडीने जाम झाला. स्थानिक नागरिकांनी देखील ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक पोलिसांना मदत केली.